ePaper भाजपाकडून महाराष्ट्रातल्या चार विद्यमान खासदारांचा पत्ता कट, नव्या चेहऱ्यांना संधी!

| वर्ष - 7 | अंक - 297 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**

- रोहित शर्मा हा एक उत्कृष्ट कर्णधार!
- बच्चन यांचा शेजारी व्हायचंय?
- जागावाटपाचा तिढा सुटला
- पंकजा लोकसभेच्या रिंगणात


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 14 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## नागरिकांनी कर भरून महापालिकेला सहकार्य करावे

# थकबाकीदारांसाठी 'अभय' नाहीच!

### आयुक्त शेखर सिंह: थकबाकीदारांना संपूर्ण कर भरावाच लागणार

। पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता कराची चालू मागणी व थकीत कर वसुलीसाठी जोरदार मोहिम सुरू आहे. मात्र, थकबाकीदारांसाठी महापालिका अभय योजना लागू करणार आहे का, याबाबत नागरिकांकडून सातत्याने विचारणा होऊ लागली आहे. महापालिकेची अभय योजना किंवा विलंब शास्ती माफीची योजना 1 एप्रिल 2022 पासून कायमस्वरुपी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे थकबाकीदारांना संपूर्ण कर भरावाच लागणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्पष्ट केले आहे.**

पिंपरी-चिंचवड शहरात 6 लाख 22 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांडून महापालिका कर वसूल करते. यासाठी शहरातील विविध भागात कर संकलानासाठी 17 विभागीय कार्यालये आहेत. कर संकलन विभागाला 2023-24 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटी रूपयांचे उदिष्ट देण्यात आले आहे. यासाठी कर संकलन विभागाने बड्या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्ते करणे, वर्तमान पत्रात नावांची यादी




छापणे, नळजोड खंडीत करणे, स्पीकरव्दारे थकबाकीदारांची नावे जाहीर करणे यासह विविध प्रकारे कर वसुलीसाठी प्रयत्न सुरू आहेत.

थकबाकीदारांकडे महापालिकेचे पथक मालमत्ता जप्त किंवा कर वसुल करण्यासाठी गेल्यानंतर अनेक नागरिक हे अभय योजना कधी लागू होणार आहे किंवा मनपा कर शास्तीमध्ये (विलंब दंड महिना 2 टक्के प्रमाणे) माफी कधी मिळणार आहे, अशी विचारणा करत आहेत. वास्तविकता महापालिकेची अभय योजना किंवा विलंब शास्ती माफीची योजना 1 एप्रिल 2022 पासून कायम स्वरुपी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे 1 एप्रिल 2022 पासून महापालिका मालमत्ता कर विलंब दंडासह वसूल करत आहे. यापुढील काळात कोणतीही अभय योजना लागू केली जाणार नाही. त्यामुळे थकीत मालमत्ताधारकांनी त्वरीत आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन आयुक्त सिंह यांनी केले आहे. दरम्यान, 1 लाख 4 हजार 326 मालमत्ता धारकांकडे तब्बल 682 कोटींची थकबाकी आहे. त्यामुळे थकीत कर वसूल करण्यासाठी प्राधान्य दिले जात असल्याचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले.

### 830 कोटींचा टप्पा ओलांडला !

कर संकलन विभागाने महापालिकेच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात गतवर्षी 811 कोटींचा कर वसूल केला होता. मात्र, 2023-24 या आर्थिक वर्षात 13 मार्चअखेरपर्यंतचा तब्बल 830 कोटींचा टप्पा ओलांडला आहे. त्यामुळे आर्थिक वर्षातील 18 दिवसांमध्ये जास्तीत-जास्त कर वसूल करण्यासाठी सहायक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांची संपूर्ण टीम हिरारीने काम करत आहे. 1 हजार 634 मालमत्तांना जप्ती अधिपत्र डकविले थकबाकी असलेल्या 1 हजार 634 मालमत्ता धारकांना तुमची मालमत्ता जप्त का करू नये, यासाठी अधिपत्र डकविले (चिकटविले) आहे. तर 584 मालमत्ता सील केल्या आहेत.

> शहर विकासासाठी नागरिकांनी चालू मागणी आणि थकीत मालमत्ता करू भरून महापालिकेला सहकार्य करावे. थकबाकीदारांसाठी कोणतीही अभय योजना लागू करण्यात येणार नाही. त्यामुळे थकबाकीवर दंडाची रक्कम वाढण्यापेक्षा तत्काळ कर भरावा.
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.

## क्रांतीकारकांच्या भूमीतून अन्यायाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते!

### संजोग वाघेरे पाटील: आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मृतीस्थळाला दिली भेट

। पनवेल । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांच्या अन्याय, अत्याचाराविरुध्द विविध जातीजमातींना एकत्र करून सशस्त्र लढा दिला. जुलमी राजवटीला उलथवून टाकण्याची मुहूर्तमेढ रोवली. अशा क्रांतीकारकांच्या भुमीतून सदैव अन्यायाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते", असे प्रतिपादन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांनी केले.**

आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या जन्मभूमी असलेल्या रायगड जिल्ह्यातील, तसेच मावळ लोकसभा मतदारसंघातील शिरढोण येथे संजोग वाघेरे पाटील यांनी मंगळवारी भेट दिली. क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन केले. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी सरपंच वैशाली भोईर, उपसरपंच वैभव मुकादम, ग्रामपंचायत सदस्य आदेश वाघमारे, कीर्ती वाडेकर, अंकिता मॅडम, ज्योती वासेकर, नेहा महाडिक, प्रीती गायकवाड, प्रियंका



मुकदम, दीपक म्हात्रे, आदित्य साळुंखे, राम भोईर, सुदाम चौधरी, गणेश मोपी, धनाजी महाडिक, साधनाताई वासेकर, अविनाश वाकडीकर, तसेच महाआघाडीचे सर्व पदाधिकारी, माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य सदस्य, शिरढोण ग्रामस्थ, तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजोग वाघेरे पुढे म्हणाले की, "क्रांतीकारक वासुदेव फडके यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध स्वातंत्र्यासाठी सशस्त्र लढा पुकारला. भारतात त्यांनी पहिल्यांदाच सशस्त्र लढ्याची मुहूर्तमेढ रोवली. ही सशस्त्र उठावाची चळवळ पुढे देशभर पसरली आणि स्वातंत्र्य संग्रामारात रुपांतरीत झाली. म्हणूनच आपण त्यांना लढाऊ राष्ट्रवादाचे जनक मानतो. त्यांच्या कार्याची महती त्यांच्या या पवित्र भूमीला अभिवादन केल्यानंतर उमगते. या क्रांतीकारकांच्या या भूमीचा आशिर्वाद संघर्षासाठी सातत्याने प्रेरणा आणि लढण्यासाठी नवे बळ देत राहील. क्रांतिकारकांची ही जन्मभूमीचे हे ठिकाण उत्तम करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील".

### गाव भेट दौऱ्यात माता भगीनींकडून औक्षण

शिरढोण गावाबरोबर चिंचवण (ता.उरण) येथील श्री महालक्ष्मी मंदिर, तसेच परिसरात गावभेट दौ-यात गावातील नागरिक, ज्येष्ठ नागरीक, युवक व माता भगिनींची भेट घेतली. त्यावेळी गावातील माता भगिनींनी औक्षण करत भव्य स्वागत केले. येथील कार्यकर्त्यांनी सत्कार केला.

# त्यादिवशी राज ठाकरे पुण्यातून रागावून गेले!

## » राजीनाम्यानंतर साहेबांचा फोन आला : वसंत मोरे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील फायर ब्रँड नेते म्हणून वसंत मोरे यांची ओळख होती. माजी नगरसेवक असलेल्या वसंत मोरे यांनी आपल्या हातोडा स्टाईलने पुण्यात स्वतःचे वलय निर्माण केलं होतं. मागच्या दोन वर्षांपासून त्यांचा आणि पुण्यातील पक्ष संघटनेचा वाद सुरू होता. पक्षातील वरिष्ठांकडून यावर अनेकदा तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. मात्र मंगळवारी (दि. १२ मार्च) वसंत मोरे यांनी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला.**



मोरे यांनी राज ठाकरेंचा त्यांना फोन आल्याचं सांगितलं. मोरे यांनी पक्ष सोडल्यानंतर मनसेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. कोणत्याही नेत्याने यावर भाष्य केलेलं नाही.मनसेचा राजीनामा दिल्यानंतर मला अनेक पक्षातील नेत्यांचे फोन आले. राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्षातूनही मला संपर्क केला गेला. पण सर्वच पक्षांना मी सांगितलं की, सध्यातरी मी कोणतीही राजकीय भूमिका जाहीर करणार नाही. कारण मला ज्या त्रासातून पक्ष सोडावा लागला, त्यानंतरही ते लोक शहाणे झालेले नाहीत, ते आतादेखील माझ्या कार्यकर्त्यांना रात्री-अपरात्री फोन करून धमकावत आहेत. या सर्वातून स्थिर स्थावर झाल्यानंतर दोन दिवसांनी राजकीय भूमिका जाहीर करेल.", असे वसंत मोरे यांनी सांगितलं.मनसेमधून मला अनेकांचे फोन आले. राज साहेबांचाही फोन एका पदाधिकाऱ्याच्या मोबाइलवर आला होता, असं वसंत मोरे यांनी सांगितलं. "पण त्या पदाधिकाऱ्याला मी एवढंच सांगितलं की, मी हात जोडतो. पण साहेबांचा फोन मला देऊ नको. कारण आजवर संघटनेतील खरी परिस्थिती मी राज ठाकरे यांच्या कानावर घालत आलो होतो. त्यामुळे आता राजीनामा दिल्यानंतर राज ठाकरे यांच्याशी बोलून मी त्यांना दुखवू इच्छित नाही", अशी भावना वसंत मोरे यांनी व्यक्त केली.संजय राऊत यांनी वसंत मोरेंच्या राजीनाम्यावर भाष्य केलं होतं. वसंत मोरे हे रवींद्र धंगेकर यांच्याप्रमाणे चांगले कार्यकर्ते आहेत. ते स्वच्छ आहेत. त्यांनी वॉशिंग मशीनच्या दिशेने जाऊ नये, असे संजय राऊत म्हणाले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना मोरे म्हणाले की, संजय राऊत यांचा काही दिवसांपूर्वी फोन आला होता. त्यावेळी आमची चर्चा झाली होती. तसेच काल त्यांचे वॉशिंग मशीनचे विधानही मी पाहिलं. एवढ्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर प्रतिक्रिया देणं, हे माझे भाग्य समजतो.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पुण्यातील फायर ब्रँड नेते म्हणून वसंत मोरे यांची ओळख होती. माजी नगरसेवक असलेल्या वसंत मोरे यांनी आपल्या हातोडा स्टाईलने पुण्यात स्वतःचे वलय निर्माण केलं होतं.

### संजय राऊत यांचे मानले आभार

» मागच्या दोन वर्षांपासून त्यांचा आणि पुण्यातील पक्ष संघटनेचा वाद सुरू होता. पक्षातील वरिष्ठांकडून यावर अनेकदा तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. मात्र मंगळवारी (दि. १२ मार्च) वसंत मोरे यांनी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला. यानंतर एका वृत्तवाहिनीशी बोलत असताना मोरे यांनी राज ठाकरेंचा त्यांना फोन आल्याचं सांगितलं. मोरे यांनी पक्ष सोडल्यानंतर मनसेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. कोणत्याही नेत्याने यावर भाष्य केलेलं नाही.मनसेमधून मला अनेकांचे फोन आले. राज साहेबांचाही फोन एका पदाधिकाऱ्याच्या मोबाइलवर आला होता, असं वसंत मोरे यांनी सांगितलं.संजय राऊत यांनी वसंत मोरेंच्या राजीनाम्यावर भाष्य केलं होतं. वसंत मोरे हे रवींद्र धंगेकर यांच्याप्रमाणे चांगले कार्यकर्ते आहेत. ते स्वच्छ आहेत. त्यांनी वॉशिंग मशीनच्या दिशेने जाऊ नये, असे संजय राऊत म्हणाले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना मोरे म्हणाले की, संजय राऊत यांचा काही दिवसांपूर्वी फोन आला होता. त्यावेळी आमची चर्चा झाली होती. तसेच काल त्यांचे वॉशिंग मशीनचे विधानही मी पाहिलं. एवढ्या मोठ्या माणसाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर प्रतिक्रिया देणं, हे माझे भाग्य समजतो.

# भाजपकडून पुण्यात मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी

## » सांस्कृतिक पुण्याला सुसंस्कृत खासदार मिळावा : प्रवीण तरडे

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीसाठी पुण्यातून भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आणि पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. भाजपाने आज त्यांच्या लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. या यादीत महाराष्ट्रातील २० उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे.**

भाजपाने यावेळी मुरलीधर मोहोळ यांना पुण्यातून लोकसभेची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे मुरलीधर मोहोळ समर्थकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.लोकसभा निवडणुकीसाठी मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी मिळेल, अशी पहिल्यापासूनच चर्चा होती. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी राष्ट्रीय प्रचारक सुनील देवधर आणि माजी आमदार, माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची नावेदेखील चर्चेत आली होती. त्याचबरोबर माजी खासदार संजय काकडे यांनीदेखील पुण्यातून उमेदवारी मिळावी यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय अशी मोहोळ यांची पक्षात ओळख आहे. अन्य पक्षातील नेत्यांबरोबरही त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. त्यामुळे मोहोळ यांनाच उमेदवारी



मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यानुसार बुधवारी मोहोळ यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पक्षाकडून अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर झाल्यावर मुरलीधर मोहोळ यांनी आनंद व्यक्त केला.मोहोळ यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. अशातच मोहोळ यांचे मित्र आणि मराठी चित्रपट दिग्दर्शक तथा अभिनेते प्रवीण तरडे यांनीदेखील मोहोळ यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तरडे यांनी फेसबूकवर एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये त्यानी म्हटलं आहे की, मित्रवर्य मुरलीधर खूप शुभेच्छा. सांस्कृतिक पुण्याला सुसंस्कृत खासदार मिळावा ही प्रत्येक पुणेकराची ईच्छा पूर्ण होण्याच्या दृष्टीने आज पहिलं पाऊल पडलं. मुरलीधर मोहोळ प्रत्येक पुणेकराची पहीली पसंती असेल यात शंका नाही. .भाजपाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीनुसार हिना गावित यांना नंदुरबार, सुभाष भामरे-धुळे, स्मिता वाघ – जळगाव, रक्षा खडसे – रावेर, अनुप धोत्रे – अकोला, रामदास तडस – वर्धा, नितीन गडकरी – नागपूर, सुधीर मुनगंटीवार – चंद्रपूर, प्रतापराव चिखलीकर – नांदेड, रावसाहेब दानवे – जालना, भारती पवार – दिंडोरी, कपिल पाटील – भिवंडी, पियूष गोयल – उत्तर मुंबई, मिहिर कोटेचा – मुंबई उत्तर पूर्व, मुरलीधर मोहोळ – पुणे, सुजय विखे पाटील – अहमदनगर, पंकजा मुंडे – बीड, सुधाकर श्रृंगारे – लातूर, रणजीत सिंह नाईक निंबाळकर – माढा आणि संजयकाका पाटील यांना सांगलीतून लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे.

### समर्थकांमध्ये आनंदाचं वातावरण

» मुरलीधर मोहोळ समर्थकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.लोकसभा निवडणुकीसाठी मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी मिळेल, अशी पहिल्यापासूनच चर्चा होती. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी राष्ट्रीय प्रचारक सुनील देवधर आणि माजी आमदार, माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांची नावेदेखील चर्चेत आली होती. खासदार संजय काकडे यांनीदेखील पुण्यातून उमेदवारी मिळावी यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. परंतु, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांचे निकटवर्तीय अशी मोहोळ यांची पक्षात ओळख आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने 'हॉटेल वेस्ट टू बायोगॅस' प्रकल्प कार्यान्वित!

## प्रतिदिन 50 टन ओल्या कचऱ्यावर होणार प्रक्रिया

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरात गोळा होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. हॉटेल्स, रेस्टॉरंट किंवा विविध भागातून मोठ्या प्रमाणात फुड वेस्ट किंवा ओला कचरा निर्माण होत असुन त्यावर प्रक्रिया करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडे स्वतंत्र अशी व्यवस्था नव्हती. या समस्येवर उपाय म्हणून महापालिकेच्या वतीने मोशी येथे स्वच्छ भारत योजनेतून बायोगॅस प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.**



"हॉटेल वेस्ट टू बायोगॅस" अर्थात बायोगॅस प्रक्रिया प्रकल्पाद्वारे हॉटेल मधून गोळा होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून बायोगॅसची निर्मिती करण्यात येणार आहे. बायोगॅसची निर्मिती झाल्यानंतर या बायोगॅसपासून सीएनजीची निर्मिती करून हा सीएनजी कचरा वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांसाठी इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे. यामुळे महापालिकेच्या इंधन खर्चामध्येही बचत होणार आहे.



"सद्यस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रात ३५ ते ३८ टन हॉटेल वेस्ट निर्माण होत आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ५० टन प्रतिदिन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. पुढील ३० वर्षांचा विचार करून भविष्यात या प्रकल्पाची क्षमता २०० टन प्रतिदिन इतकी वाढविण्याची तरतुद करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील दुर्गंधी कमी होण्यास मदत मिळणार असून हॉटेल वेस्ट तसेच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे महापालिकेने शहर शुन्य कचरा होण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

**– शेखर सिंह,**
आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

### प्रकल्पाची उद्दिष्ट्ये

- पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील सर्व हॉटेल,रेस्टॉरंट, खाणावळी, मंगल कार्यालय, कॅन्टीन इ. मधुन गोळा होणारा ओला कचरा विशेष जीपीएस सुविधा असणाऱ्या बंदिस्त गाडीतुन गोळा करुन त्याचे विलगीकरण करणे तसेच त्यावर प्रक्रिया करणे
- सद्यस्थितित प्रकल्पाची क्षमता ५० टन प्रतिदिन इतकी असुन भविष्यात १५ वर्षात वाढणाऱ्या ओल्या कचऱ्याचा विचार करुन प्रकल्पाची क्षमता टप्प्या टप्प्याने २०० टन प्रतिदिन पर्यंत वाढविणे
- प्रकल्पात तयार होणाऱ्या बायोगॅसपासून सीएनजी बनविणे तसेच हा सीएनजी कचरा वाहतुकीच्या वाहनांसाठी उपलब्ध करुन देणे व उर्वरित गॅस खुल्या बाजारात विकणे.



"कचरा वाहतुकीची वाहने प्रकल्पातून तयार होणाऱ्या इंधनावर चालणार आहेत. पर्यावरणाचे संतुलन टिकवून ठेवण्यासाठी बायोगॅस हा योग्य पर्याय आहे. बायोगॅस प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कचरा वाहतुकीची सर्व वाहने याच प्रकल्पातून तयार होणाऱ्या इंधनावर चालविण्याचे नियोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच या प्रकल्पातून तयार होणारा सीएनजी खुल्या बाजारात विक्रीसाठीही उपलब्ध होणार आहे.

**–संजय कुलकर्णी,**
सहशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

---

# महापालिका विभागांमध्ये पेपरलेस कार्यप्रणालीची अंमलबजावणी सुरू!

## 5 प्रणालींचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते अनावरण; 35 विभागाचा कारभार होणार ऑनलाईन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार आता कागदविरहीत (पेपरलेस) होणार असून प्रशासनाने त्या दिशेने पाऊल टाकले आहे. महापालिकेत जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीमुळे सर्व कारभार ऑनलाईन करण्यावर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी भर दिला असून, विवाह नोंदणी प्रणाली, प्रेक्षागृह, नाट्यगृहे बुकींग, ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली, माहिती अधिकार प्रणाली, पशुवैद्यकीय व्यवस्थापन या विभागाच्या जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचे अनावरण मंगळवारी स्थायी समिती सभागृहात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले.**



यावेळी, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडमार्फत जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ३५ विभागाचे दैनंदिन कामकाज कागदविरहीत सूरू होईल. या कार्य प्रणालीनुसार यापुढे महापालिकेच्या विविध विभागांचे कामकाज ऑनलाईन चालणार आहे. या कार्यप्रणालीमुळे महापालिकेतील सर्व विभाग ऑनलाईन जोडण्यात येत आहेत. तसेच या प्रणालीमुळे नागरी सेवा-सुविधा, सर्व फाईल्सचे कामकाज ऑनलाईन दिसणार आहे. त्यामुळे महापालिकेतील अधिकारी – कर्मचाऱ्यांचे श्रम वाचून व्यवहारात पारदर्शकता येणार असून फाईलला देखील दिरंगाई लागणार नाही. महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयातील विवाह नोंदणी प्रमाणपत्र, सर्व नाट्यगृहाचे बुकींग, ग्रंथालये, पशुवैद्यकीय विभागातील श्वान परवाने, माहिती अधिकार अर्ज (आरटीआय), विविध विभागाचे कागदविरहित (पेपरलेस) ऑनलाईन कामकाज करण्यात येत आहे. आतापर्यंत नऊ विभागाचे कामकाज ऑनलाईन केलेले आहे. यापुढे अन्य उर्वरित विभागाचे कामकाज देखील ऑनलाईन करण्यात येणार आहे. जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीद्वारे नागरी सुविधा, सुरक्षा, ग्रंथालय, क्षेत्रीय कार्यालये, वैद्यकीय विभाग, भांडार विभाग यासह अन्य विभागाचे कामकाज ऑनलाईन होत आहे. याद्वारे महापालिकेच्या संबंधित विभागातील अधिकारी- कर्मचारी यांना आपल्या विभागातील सर्व माहिती ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये जीएसआय सक्षम ईआरपी प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहित (पेपरलेस) होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे.

### विवाह नोंदणी झाली सोपी

- पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आता घरी बसून ऑनलाईन विवाह नोंदणी करता येणार आहे. कागदपत्रे अपलोड केल्यानंतर, मनपा क्षेत्रिय कार्यालयाकडून वेळ राखीव ठेवण्यात येणार आहे. मेसेज/ ई-मेलद्वारे राखीव तारीख व वेळेची सूचना, फोटो आणि बोटाचे ठसे घेण्याची सुविधा/ कागदपत्रांची पडताळणी, ऑनलाईन पेमेंट, ऑनलाईन विवाह नोंदणी प्रमाणपत्र, प्रमाणपत्रातील दुरुस्ती, विवाह संस्थांचे रजिस्ट्रेशन / संस्थांची पुर्ननोंदणी करता येणार आहे.

# शांततेत जगण्यासाठी युद्धसज्ज असावे



## भूमिका

**अग्नी-५ या क्षेपणास्त्राची मूळ चाचणी डिसेंबर २०२२ मध्येच घेण्यात आली होती. परवा या क्षेपणास्त्राच्या 'एमआयआरव्ही' तंत्रज्ञान आधारित अवताराची चाचणी यशस्वी ठरली. भारतीय संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रासाठी हा दिवस विशेष कौतुकास्पद ठरतो आणि समस्त भारतीयांसाठी अभिमानास्पदही.**

'शांततामय सहजीवन' या भारताच्या परराष्ट्र आणि सामरिक धारणेलाच तडे जातील अशा घटना गेल्या काही वर्षांत घडलेल्या आहेत. पुंड देशांकडून जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीला, जगातील सर्वाधिक लोकशाहीवादी खंडाला धोका निर्माण झाला आहे. शांततेत जगण्यासाठी युद्धसज्ज असावे लागते असे सामरिक अभ्यासक्रमात सातत्याने बजावले जाते. हे युद्धसज्ज असणे म्हणजे काय, ते अग्नी-५ एमआयआरव्ही क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीने दाखवून दिले. सामरिक अभ्यासक्रमाचे आणखी एक तत्त्व असते. अधिग्रहित शस्त्रसज्जतेचा फायदा म्हणजे बऱ्याचदा शस्त्रे वापरण्याची वेळच येत नाही. याउलट, दुर्लक्षातून उद्भवलेल्या कमकुवतपणाचा तोटा म्हणजे तुमचा शत्रू दु:साहसी बनू शकतो! त्यामुळेच 'मिनिमम डिटरन्स' अर्थात पुरेशी जरब य संकल्पनेला कोणत्याही देशाच्या सामरिक धोरणात विशेष महत्त्व प्राप्त होते. अण्वस्त्रसज्जता, क्षेपणास्त्रसिद्धता, अंतराळ युद्धसज्जता या माध्यमातून



आपण शत्रूसाठी पुरेशी जरब निर्माण करत असतो. भारताचे परराष्ट्र धोरण नेहमीच शांतताकेंद्री राहिले, तरीही तीन युद्धे (१९६२, १९६५, १९७१) आणि दोन लढाया (१९४८, १९९९) आपल्यावर लादल्या गेल्याच. जगात इतर कोणत्याही भूभागापेक्षा भारत हा सर्वाधिक असुरक्षित म्हणवता येईल, अशा टापूमध्ये वसलेला आहे. वायव्य, उत्तरेकडे पाकिस्तान आणि उत्तर व ईशान्येकडे चीन या दोन अण्वस्त्रसज्ज देशांनी भारताच्या सीमा ग्राह्य मानलेल्या नाहीत. भारताच्या सार्वभौमत्वाला सतत आव्हान देणे हे या दोन्ही देशांचे प्रधान धोरण राहिलेले आहे. अशा परिस्थितीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाधारित शस्त्रास्त्रांनी सज्ज राहणे ही आपली केवळ गरज नसून, तो अस्तित्वाचाही प्रश्न ठरतो.अग्नी-५ च्या चाचणीकडे या दृष्टिकोनातून पाहावे लागेल. त्यासाठी प्रथम संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) अभिनंदन करावे लागेल. ओडिशाच्या किनाऱ्याजवळ ए. पी. जे. अब्दुल कलाम बेटावरून ही यशस्वी चाचणी घेण्यात आली, हेदेखील योग्यच. भारताचे माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम हे या देशाच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचे प्रणेते. अग्नी, पृथ्वी, आकाश, नाग अशी विविध क्षेपणास्त्रे विकसित करण्याच्या गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक मोहिमेत द्रष्टेपणा आणि नेतृत्व अशा दोन्ही आघाड्यांवर कलाम यांचे योगदान बहुमोल ठरते. देशांतर्गत शस्त्रास्त्रनिर्मितीबाबत डीआरडीओचे प्रगती पुस्तक फार आश्वासक आणि आशादायी नाही. अर्जुन रणगाडे, तेजस लढाऊ विमाने, ध्रुव हेलिकॉप्टर यांच्या निर्मितीसाठी लागलेल्या विलंबाचे खापर सर्वस्वी या संस्थेच्या माथी फोडणे कदाचित अन्याय्य ठरेल. परंतु या विलंबामुळे देशातील सैन्यदल उच्चपदस्थांचा देशी बनावटीच्या शस्त्रसामग्रीवरील विश्वास उडाला होता, हे अमान्य करता येत नाही. या निराशाजनक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाच्या यशाची झळाळी विलक्षण उठून दिसते. अग्नी-५ ला एमआयआरव्ही तंत्रज्ञानाचा साज चढवून डीआरडीओने क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आंतरखंडीय क्षेपणास्त्रांचा वापर तसा दुर्मीळ आणि उद्दिष्टही मर्यादित. एकल लक्ष्याचा विविध स्फोटकाग्रांनी विध्वंस करणे हे ते पारंपरिक उद्दिष्ट. परंतु एमआयआरव्ही तंत्रज्ञानामुळे एकाच वेळी अनेक लक्ष्यांचा वेध घेता येईल. त्यामुळे शत्रुदेशाकडे क्षेपणास्त्र बचाव प्रणाली असली, तरी ती कुचकामी ठरेल. हे तंत्रज्ञान अर्थातच अमेरिका, रशिया, चीन, ब्रिटन आणि फ्रान्स या देशांकडेही आहे. पाकिस्तान आणि इस्रायलने ते आत्मसात केल्याची चर्चा आहे. मोठे आणि प्रमुख देश शस्त्रसामग्रीच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीवर लक्ष केंद्रित करू लागले आहेत. यातून उपग्रहविरोधी अस्त्रे, हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे, एमआयआरव्ही आधारित आंतरखंडीय क्षेपणास्त्रे विकसित होऊ लागली आहेत. या स्पर्धेत भारत विलंबाने उतरला असला, तरी मागे पडलेला नाही ही बाब सुखावणारी ठरते.

## संपादकीय »

### काय नि तीन काय?

***आयुक्तांच्या राजीनाम्याबद्दल अधिकृतपणे काही सांगण्याची गरजही कोणास वाटत नाही, यातून व्यवस्थेच्या पारदर्शकतेबाबत महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात...***

निवडणुकांच्या तोंडावर राजीनामा देऊन निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी अनेकांची तशी पंचाईत केली. त्यांचा राजीनाम्याचा निर्णय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनाच माहीत नव्हता आणि आज राजीनाम्यास तीन दिवस होत आले तरी त्यामागील कारण कोणास ठाऊक नाही. प्रथेप्रमाणे खरे तर आपला राजीनामा त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांकडे देणे अपेक्षित होते. कारण गोयल हे कुमार यांस उत्तरदायी होते. पण तरी त्यांनी राजीनामा पाठवून दिला तो थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे. राष्ट्रपतींनी दुसऱ्या दिवशी तो स्वीकारला आणि तसे जाहीर झाल्यावर गोयल यांच्या राजीनाम्याची बातमी झाली. त्याआधी पश्चिम बंगाल आदी राज्यांच्या निवडणूक तयारी पाहणी दौऱ्यात गोयल हे मुख्य निवडणूक आयुक्तांसमवेत होते. त्या वेळीही त्यांना गोयल यांच्या हालचालींचा सुगावा लागला नाही.

संविधानाने लिंगभेद नाकारताना लिंगभावही नाकारलाच असे म्हणता येईल? राजकीय समानता संविधानामुळे प्रस्थापित झाली, पण सामाजिक समतेसाठी संविधान 'चालवावे' लागणार, काही हस्तक्षेप करावे लागणार, ते होताहेत का?८ मार्चच्या महिला दिनाच्या आगेमागे प्रदर्शित झालेला किरण राव यांचा 'लापता लेडीज' हा नवा चित्रपट.

## स्त्रियांच्या अधिकारांचा विचार केला तर

सौम्य आणि सुखान्त स्त्रीवादाची मांडणी करणारा. आपल्या प्रदीर्घ चित्रपट कारकीर्दीच्या उत्तरार्धात श्याम बेनेगल यांनी ज्याप्रमाणे 'वेलकम टू सज्जनपूर'सारख्या काही सुखान्तिका बनवल्या तशीच 'लापता लेडीज'ची जातकुळी आहे. ग्रामीण (मध्य) भारतातल्या दोन, लग्नानंतर/लग्नामुळे बेपत्ता झालेल्या बायकांच्या आत्मशोधाचा प्रवास म्हणजे हा चित्रपट. या प्रवासात त्या दोन बायकांनी आपल्या भवतालच्या समुदायालाही आत्मशोधाची वाट दाखवली. आणि या वाटेवर त्यांना त्यांचे कुटुंब, नागरी समाज आणि (मुख्यत: पोलिसांकरवी काम करणारी) राज्यसंस्था अशा सर्व घटकांनी मदत केली म्हणून या पडद्यावरच्या आत्मशोधाचे रूपांतर हव्याशा सुखान्तिकेत; स्त्रीवादाच्या सौम्य मांडणीत झाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या; गेल्या पाऊणशे वर्षांच्या काळात भारतीय स्त्रियांचा असाच एक सामूहिक आत्मशोधाचा प्रवास सुरू आहे. वाटेवरच्या अनेक खाचखळग्यांना तोंड देत स्त्रिया स्वतंत्र



भारताच्या स्वायत्त नागरिक म्हणून आपल्या आशा-आकांक्षा जागत्या ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत. या प्रयत्नांना फारसे यश मात्र आलेले दिसत नाही. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे नको इतके गोडवे गायले जात असले तरीही भारतीय स्त्रियांचा गेल्या ७५ वर्षांतला आत्मशोधाचा प्रवास आणखी बिकटच बनत गेलेला आढळेल. आणि या बिकट वाटेचा मागोवा घेताना भारतीय संविधानाच्या सामाजिक वाटचालीतील काही महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधता येईल. स्त्रियांच्या राजकीय अधिकारांचा विचार केला तर भारतीय संविधान आपल्या क्रांतिकारक भूमिकेमुळे साऱ्या जगात उठून दिसेल. जगातील सर्व तथाकथित 'प्रगत' लोकशाही देशांमधील स्त्रियांना मतदानाच्या मूलभूत लोकशाही अधिकारासाठी झगडावे लागले. भारतातील संविधानसभेने सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्त्व स्वीकारताना; स्त्रियांसाठी (आणि दलित, आदिवासी, 'अशिक्षित' मानले गेलेले, अशा अनेक वंचितांसाठी) एक क्रांतिकारक राजकीय आणि सुप्त रूपातला सामाजिक अवकाशही खुला करून दिला. त्याआधीही सामाजिक सुधारणा चळवळींपासून ते गांधींच्या मातृहृदयीभा सक्षमीकरणाची नानाविध प्रतीके भारतीय राष्ट्रवादात पुढे आली. तरीही भारतीय संविधान बहुतांशी 'लिंगभाव आंधळे' (जेंडर ब्लाइंड) राहिले असा आक्षेप त्यावर घेतला गेला. याचे कारण म्हणजे उदारमतवादी लोकशाही चौकटीचा भाग म्हणून स्त्रियांना समान (मतदानविषयक) राजकीय अधिकार बहाल करतानाच; स्त्रियांच्या असमान आणि म्हणून वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक स्थानाची आणि त्यातून स्त्रियांना आवश्यक ठरणाऱ्या विशेषाधिकारांची चर्चा मात्र संविधानाने केली नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पंकजा पहिल्यांदाच लोकसभेच्या रिंगणात!

## भाजपकडून बीड लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंकजा मुंडे यांनी काही दिवसांपूर्वीच पूर्वी १४ वर्षांचा वनवास असायचा. मात्र हा पाच वर्षांचा वनवास पुरे असं म्हटलं होतं. तो वनवास भाजपाची लोकसभा उमेदवारांची दुसरी यादी आल्यानंतर संपला आहे. कारण पंकजा मुंडे यांना बीडमधून लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे. पंकजा मुंडे या बीड लोकसभा मतदारसंघातून आता लोकसभा लढवतील.**




महाराष्ट्रातल्या ४८ पैकी २० नावांची घोषणा भाजपाकडून करण्यात आली आहे. एकीकडे पंकजा मुंडेंचा वनवास संपला आहे, मात्र प्रीतम मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे."एवढे दिवस वनवास भोगला आहे. बापरे, म्हटलं वनवास पाचच वर्षांचा असावा या युगात बाबा. जुन्या काळात १४ वर्षांचा वनवास होता, आम्हाला पाच वर्षांचा वनवास पुरे झाला की तुम्हाला अजून पाहिजे? तुम्ही सगळे आहात ना माझ्याबरोबर? मला माहीत नाही ईश्वराने माझ्या भाग्यात काय लिहिलं आहे, आत्तापर्यंत काय लिहिलं होतं? तुमच्या प्रेमाव्यतिरिक्त काही मिळालेलं नाही. माझ्या जीवनाबद्दल मी फार बोलत नाही. पण मी फार दुःख, यातना, वेदना भोगून झाल्या आहेत. सगळं काही भोगूनही मी चेहरा हसरा ठेवते. याचं कारण तुम्ही म्हणजेच माझे सगळे कार्यकर्ते आहात."पंकजा मुंडे या विधानसभेची २०१९ ची निवडणूक हरल्या होत्या. त्यानंतर त्यांना साईड ट्रॅक करण्यात आल्याच्या चर्चा वारंवार रंगल्या. इतकंच काय त्या राष्ट्रवादी किंवा शिवसेनेत जातील अशाही चर्चा रंगल्या. मात्र पंकजा मुंडे यांनी कुठल्याही चर्चांकडे लक्ष न देता आपली वाटचाल करणं सुरु ठेवलं. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर त्यांचा पाच वर्षांचा वनवास आता संपला आहे. असं असलं तरीही पंकजा मुंडेंची सख्खी बहीण प्रीतम मुंडे यांचं तिकिट मात्र कापण्यात आलं आहे. बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजा मुंडेंना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आहे.पंकजा मुंडे या महाराष्ट्रातल्या आक्रमक नेत्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे. २०१४ मध्ये त्यांना फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळात महिला आणि बालकल्याण विभाग सोपवण्यात आला होता. त्यांच्यावर चिक्की घोटाळ्याचे आरोपही त्या काळात झाले होते. मात्र आपल्यावर झालेल्या आरोपांना त्यांनी सभागृहात वारंवार आक्रमकपणे उत्तर दिलं होतं. २०१९ ची विधानसभा निवडणूक त्या हरल्या होत्या. त्यांच्या विरोधात त्यांचे बंधू आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे निवडून आले होते. ही लढत खूप चुरशीची झाली होती. पंकजा मुंडे या मागच्या पाच वर्षांपासून भाजपासाठीच कार्यरत आहेत. मात्र त्यांच्याबाबत विविध चर्चा झाल्या. मात्र कुठल्याही चर्चांकडे लक्ष न देता त्यांनी पक्षाविषयीची निष्ठा कायम ठेवली. भाजपाने प्रीतम मुंडेंना लोकसभेची उमेदवारी नाकारली आहे. मात्र त्यांच्या जागी पंकजा मुंडेंना संधी दिली आहे. त्यामुळे उमेदवारी एकाच घरात राहिली आहे.महाराष्ट्रातल्या ४८ पैकी २० नावांची घोषणा भाजपाकडून करण्यात आली आहे. एकीकडे पंकजा मुंडेंचा वनवास संपला आहे, मात्र प्रीतम मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे."एवढे दिवस वनवास भोगला आहे. बापरे, म्हटलं वनवास पाचच वर्षांचा असावा या युगात बाबा. जुन्या काळात १४ वर्षांचा वनवास होता, आम्हाला पाच वर्षांचा वनवास पुरे झाला की तुम्हाला अजून पाहिजे? तुम्ही सगळे आहात ना माझ्याबरोबर? मला माहीत नाही ईश्वराने माझ्या भाग्यात काय लिहिलं आहे.

### पाच वर्षांचा वनवास आता संपला

» महाराष्ट्रातल्या ४८ पैकी २० नावांची घोषणा भाजपाकडून करण्यात आली आहे. एकीकडे पंकजा मुंडेंचा वनवास संपला आहे, मात्र प्रीतम मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे."एवढे दिवस वनवास भोगला आहे. बापरे, म्हटलं वनवास पाचच वर्षांचा असावा या युगात बाबा. जुन्या काळात १४ वर्षांचा वनवास होता, आम्हाला पाच वर्षांचा वनवास पुरे झाला की तुम्हाला अजून पाहिजे? तुम्ही सगळे आहात ना माझ्याबरोबर? मला माहीत नाही ईश्वराने माझ्या भाग्यात काय लिहिलं आहे, आत्तापर्यंत काय लिहिलं होतं? तुमच्या प्रेमाव्यतिरिक्त काही मिळालेलं नाही. माझ्या जीवनाबद्दल मी फार बोलत नाही. पण मी फार दुःख, यातना, वेदना भोगून झाल्या आहेत. सगळं काही भोगूनही मी चेहरा हसरा ठेवते. याचं कारण तुम्ही म्हणजेच माझे सगळे कार्यकर्ते आहात."पंकजा मुंडे या विधानसभेची २०१९ ची निवडणूक हरल्या होत्या. चर्चा वारंवार रंगल्या. इतकंच काय त्या राष्ट्रवादी किंवा शिवसेनेत जातील अशाही चर्चा रंगल्या. मात्र पंकजा मुंडे यांनी कुठल्याही चर्चांकडे लक्ष न देता आपली वाटचाल करणं सुरु ठेवलं. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर त्यांचा पाच वर्षांचा वनवास आता संपला आहे. असं असलं तरीही पंकजा मुंडेंची सख्खी बहीण प्रीतम मुंडे यांचं तिकिट मात्र कापण्यात आलं आहे.

# महाराष्ट्रातल्या 4 विद्यमान खासदारांचा पत्ता कट

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निवडणूक आयोग लवकरच देशातल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर करू शकतो. या पार्श्वभूमीवर देशभरातील विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. वेगवेगळे पक्ष त्यांच्या लोकसभा उमेदवारांच्या याद्या जाहीर करू लागले आहेत.**

गेल्या आठवड्यात भारतीय जनता पार्टीने त्यांच्या लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. याद्वारे भाजपाने १९५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यापाठोपाठ भाजपाने आता त्यांची दुसरी यादी जाहीर केली आहे. भाजपाने पहिल्या यादीत महाराष्ट्राच्या एकाही उमेदवाराचं नाव जाहीर केलं नव्हतं. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला भाजपाच्या उमेदवारांची नावं जाणून घेण्याची उत्सुकता होती. अशातच भाजपाने आज त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे.भाजपाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीनुसार हिना गावित यांना नंदुरबार,



सुभाष भामरे-धुळे, स्मिता वाघ – जळगाव, रक्षा खडसे – रावेर, अनुप धोत्रे – अकोला, रामदास तडस – वर्धा, नितीन गडकरी – नागपूर, सुधीर मुनगंटीवार – चंद्रपूर, प्रतापराव चिखलीकर – नांदेड, रावसाहेब दानवे – जालना, भारती पवार – दिंडोरी, कपिल पाटील – भिवंडी, पियूष गोयल – उत्तर मुंबई, मिहिर कोटेचा – मुंबई उत्तर पूर्व, मुरलीधर मोहोळ – पुणे, सुजय विखे पाटील – अहमदनगर, पंकजा मुंडे – बीड, सुधाकर श्रृंगारे – लातूर, रणजीत सिंह नाईक निंबाळकर – माढा आणि संजयकाका पाटील यांना सांगलीतून लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे. दरम्यान, भाजपाने चार विद्यमान खासदारांचा पत्ता कट केला आहे. भाजपाने उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून गोपाळ शेट्टी यांच्या जागी पियूष गोयल यांना तर मुंबई उत्तर पूर्वमधून मनोज कोटक यांच्या जागी मिहिर कोटेचा यांना उमेदवारी दिली आहे. बीडमधून प्रीतम मुंडे यांच्या जागी पंकजा मुंडे, तर जळगावमधून उन्मेष पाटील यांच्या जागी स्मिता वाघ यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्रातील २० उमेदवारांसह भाजपाने देशभरातील इतर राज्यांमधील ५२ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत.

### तेलंगणमधले 6 उमेदवार जाहीर

» एक, दादरा आणि नगर हवेलीमधील एक आणि तेलंगणमधले ६ उमेदवार जाहीर केले आहेत.निवडणूक आयोग लवकरच देशातल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर करू शकतो. या पार्श्वभूमीवर देशभरातील विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. वेगवेगळे पक्ष त्यांच्या लोकसभा उमेदवारांच्या याद्या जाहीर करू लागले आहेत.

# बिहारमधील जागावाटपाचा तिढा सुटला!

## नड्डा यांच्या निवासस्थानी मित्रपक्षांची बैठक उत्साहात

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमधील लोकसभेच्या जागावाटपासाठी गेल्या काही दिवसांपासून एनडीएतील प्रमुख नेत्यांच्या बैठका चालू आहेत. जदयू, भाजपा, हिंदुस्तान आवाम मोर्चा, उपेंद्र कुशवाह यांचा पक्ष आणि चिराग पासवान यांच्या पक्षात रस्सीखेच चालू होती. अखेर एनडीएतील सर्वपक्षांमध्ये जागावाटप पूर्ण झालं असल्याचं वृत्त समोर आलं आहे. बिहारमध्ये एनडीएत जीतनराम मांझी यांच्या हिंदुस्तान आवाम मोर्चाला एक, उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोक मोर्चा या पक्षाला एक, चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीला एक जागा दिली जाणार आहे.**



यासह नितीश कुमार संयुक्त जनता दल पक्षाला १६ जागा दिल्या जाणार आहेत. तर उर्वरित २० जागांवर भाजपाचे उमेदवार निवडणूक लढवतील. दरम्यान, पशुपती पारस यांच्या पक्षाला एनडीएने एकही जागा दिलेली नाहीतसेच समस्तीपूरचे खासदार प्रिन्स राज यांना बिहारच्या मंत्रिमंडळातील मंत्री बनवण्याची ऑफर देण्यात आली आहे. आज तकने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. प्रिन्स राज हे चिराग पासवान यांचे चुलत भाऊ आहेत. वडील रामचंद्र पासवान यांच्या निधनानंतर प्रिन्स राज समस्तीपूरमधून खासदार म्हणून निवडून आले होते. परंतु, २०२१ मध्ये त्यांचा लोक जनशक्ती पक्ष फुटला. त्यानंतर प्रिन्स राज यांनी पशुपती पारस यांच्याशी घरोबा केला.भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी बिहारमधील एनडीएतल्या मित्रपक्षांची बैठक पार पडली. चिराग पासवान आणि मंगल पांडेय हे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीपूर्वी मंगल पांडेय यांनी पशुपती पारस यांच्याबरोबर जागावाटपावर चर्चा केली होती. दरम्यान, चिराग पासवान हे हाजीपूरमधून लोकसभा लढवू शकतात.दरम्यान, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत हिमचाल प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, त्रिपुरा या राज्यांमधील तसेच दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. विशेष म्हणजे नितीन गडकरी, पंकजा मुंडेंसह महाराष्ट्रातल्या २० उमेदवारांची नावं या यादीमध्ये आहेत. भाजपाने सुधीर मुनंगटीवार, मुरलीधर मोहोळ यांनाही लोकसभेचं तिकिट दिलं आहे. तर मुंबईतून गोपाळ शेट्टींचा पत्ता कट करण्यात आला आहे. पंकजा मुंडे यांना पहिल्यांदाच लोकसभेत नशीब आजमावण्याची संधी देण्यात आली आहे. त्या बीडची लोकसभा लढवतील.यासह नितीश कुमार संयुक्त जनता दल पक्षाला १६ जागा दिल्या जाणार आहेत. तर उर्वरित २० जागांवर भाजपाचे उमेदवार निवडणूक लढवतील. दरम्यान, पशुपती पारस यांच्या पक्षाला एनडीएने एकही जागा दिलेली नाही.

### जागावाटप यावरून विसंवाद

यासह नितीश कुमार संयुक्त जनता दल पक्षाला १६ जागा दिल्या जाणार आहेत. तर उर्वरित २० जागांवर भाजपाचे उमेदवार निवडणूक लढवतील. दरम्यान, पशुपती पारस यांच्या पक्षाला एनडीएने एकही जागा दिलेली नाही. भाजपा पशुपती पारस यांना राज्यपाल बनवण्याच्या विचारात आहे. तसेच समस्तीपूरचे खासदार प्रिन्स राज यांना बिहारच्या मंत्रिमंडळातील मंत्री बनवण्याची ऑफर देण्यात आली आहे. आज तकने याबाबतचं वृत्त प्रसिद्ध केलं आहे. प्रिन्स राज हे चिराग पासवान यांचे चुलत भाऊ आहेत. वडील रामचंद्र पासवान यांच्या निधनानंतर प्रिन्स राज समस्तीपूरमधून खासदार म्हणून निवडून आले होते. परंतु, २०२१ मध्ये त्यांचा लोक जनशक्ती पक्ष फुटला. त्यानंतर प्रिन्स राज यांनी पशुपती पारस यांच्याशी घरोबा केला.भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी बिहारमधील एनडीएतल्या मित्रपक्षांची बैठक पार पडली. चिराग पासवान आणि मंगल पांडेय हे या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीपूर्वी मंगल पांडेय यांनी पशुपती पारस यांच्याबरोबर जागावाटपावर चर्चा केली होती. दरम्यान, चिराग पासवान हे हाजीपूरमधून लोकसभा लढवू शकतात.दरम्यान, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे.


# सीएएमुळे आपल्या नोकऱ्या जाणार

## केजरीवालांच्या दाव्यावर भाजपाचा पलटवार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने नागरिकत्व सुधारणा विधेयकाची (सीएए) अधिसूचना सोमवारी (११ मार्च) जारी केली. यामुळे पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधील अल्पसंख्यांक नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हिंदू, जैन, शीख, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन या धर्मातील अल्पसंख्यांकांना भारताचे नागरिकत्व देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.**





मात्र, सरकारच्या या निर्णयाला पश्चिम बंगाल सरकार, तमिळनाडू सरकारकडून विरोध चालू आहे. अशातच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीदेखील या निर्णयाविरोधात शड्डू ठोकला आहे. केंद्र सरकारने ऐन लोकसभा निवडणुकीच्या आधी हा निर्णय घेतल्यामुळे भाजपा मतदानासाठी हे सगळं करत असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे.

आपल्या नोकऱ्या आणि घरं पाकिस्तानी लोकांना देण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोपही केजरीवाल यांनी केला आहे.दरम्यान, केजरीवाल यांच्या आरोपांना वरिष्ठ भाजपा नेते रवीशंकर प्रसाद यांनी उत्तर दिलं आहे. प्रसाद म्हणाले, सीएएमुळे कोणाचीही नोकरी जाणार नाही. तसेच कोणत्याही व्यक्तीचं नागरिकत्व हिरावून घेतलं जाणार नाही, किंवा घरं हिरावली जाणार नाहीत. मुळात अरविंद केजरीवाल कसले तर्क मांडतायत तेच मला कळत नाहीये. ज्या लोकांवर पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमध्ये अन्याय झाला, ज्यांच्यावर अत्याचार केले गेले तेच लोक भारतात आले आहेत.

त्यांचं पुनर्वसन करणं आपलं कर्तव्य नाही का? सीएएद्वारे आपण तेच करत आहोत. रवीशंकर प्रसाद म्हणाले, मला देशातल्या सर्व लोकांना आश्वस्त करायचं आहे की, सीएएमुळे कोणाचंही नागरिकत्व किंवा नोकरी हिरावली जाणार नाही. सीएए केवळ नागरिकत्व देण्यासाठी आहे. तसेच गृहमंत्रालयाने आधीच स्पष्ट केलं आहे की, सीएएचा भारतातल्या मुस्लीम समुदायाशी कसलाही संबंध नाही. त्यामुळे विरोधकांनी सीएएबद्दल खोटं बोलणं, खोटा प्रचार करणं बंद करावं.

# राजीनाम्यानंतर खट्टर यांनी आमदारकीही सोडली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर कुरुक्षेत्रचे खासदार नायब सिंह सैनी यांनी हरियाणाचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ऐन लोकसभा निवडणुकीच्या आधीच हरियाणात मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. मनोहरलाल खट्टर यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता त्यांनी आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा विधानसभेत केली. यावेळी विधानसभेत बोलताना मनोहरलाल खट्टर यांनी पक्ष जी नवी जबाबदारी देईल, ती पार पाडणार असल्याचे सांगितले. मनोहरलाल खट्टर हे २०१४ पासून कर्नाल मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत होते. मनोहरलाल खट्टर हे लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची शक्यता आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हरियाणात मनोहरलाल खट्टर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी आठ जागांवर भाजपाचे उमेदवार विजयी करण्यात यश मिळविले होते. मनोहरलाल खट्टर यांच्याकडे उत्तम संघटक व उत्तम प्रशासक म्हणून पाहिले जाते. आता खट्टर यांना भाजपाचे वरिष्ठ नेते दुसरी मोठी जबाबदारी देण्याची शक्यता आहे.मनोहरलाल खट्टर यांनी हरियाणा विधानसभेत बोलताना आमदारकीचा राजीनामा देण्याची घोषणा केली. ते म्हणाले, “मी आज कर्नाल विधानसभा मतदारसंघाच्या आमदारकीचा राजीनामा देत आहे.

# बच्चन यांचा शेजारी व्हायचंय? मग मोजावे ‘इतके’ कोटी

आजही कित्येक तरुण कलाकारांना लाजवेल असा उत्साह असणारे बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे कायम त्यांच्या कामामुळे चर्चेत असतात. आजही त्यांच्या घराबाहेर त्यांचे लाखों चाहते त्यांची एक झलक पाहण्यासाठी फार आतुर असतात. दर रविवार बिग बी हे त्यांचे घराबाहेर येऊन त्यांच्या चाहत्यांची भेट घेतात, पण आता बिग बी यांचे शेजारी होण्याची संधी चालून आली आहे. या महानायकाच्या घराच्या बाजूला त्याचा शेजारी म्हणून राहायला कोणाला आवडणार नाही? आता ही आयती संधी चालून आली आहे. अमिताभ बच्चन यांचे चाहते आता त्यांचे शेजारी बनू शकतात. कसं तेच आपण जाणून घेणार आहोत. अमिताभ बच्चन यांच्या जुहू परिसरातील ‘जलसा’ या बंगल्याच्या बाजूचाच एक बंगला लिलावात काढला जाणार असल्याचे वृत्त समोर आले आहे.‘आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षिततेची अंमलबजावणी’ या कायद्यांतर्गत ‘जलसा’च्या बरोबर बाजूच्या प्रॉपर्टीचा लिलाव करण्यात येणार आहे. ३३३९ स्क्वेअर फिट या परिसरात उभ्या असलेल्या या बंगल्याचा लिलाव २७ मार्च रोजी करण्यात येणार आहे. या बंगल्याची किंमत २५ कोटी असल्याचे सांगितले जात आहे. ‘डच बँक’कडून या बंगल्याचा लिलाव पार पाडण्यात येणार आहे. अमिताभ बच्चन यांचा शेजारी म्हणून राहण्यासाठी २५ कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. बच्चन यांच्या ‘जलसा’ या बंगल्याशी त्यांच्या चाहत्यांचे एक भावनिक कनेक्शन आहे. गेल्या ४० वर्षांपासून अमिताभ बच्चन त्यांच्या या बंगल्याबाहेर येऊन त्यांच्या चाहत्यांची भेट घेतात. दर रविवारी तुम्हाला बिग बी यांच्या घराबाहेर असंख्य चाहत्यांची गर्दीही पाहायला मिळते. बिग बी आता लवकरच प्रभासच्या ‘कल्की २८९८ एडी’ या बिग बजेट चित्रपटात झळकणार आहेत. या चित्रपटात बिग बी यांच्याबरोबर दीपिका पदूकोण, प्रभास, कमल हासनदेखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.आजही कित्येक तरुण कलाकारांना लाजवेल असा उत्साह असणारे बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे कायम त्यांच्या कामामुळे चर्चेत असतात. आजही त्यांच्या घराबाहेर त्यांचे लाखों चाहते त्यांची एक झलक पाहण्यासाठी फार आतुर असतात.

## आमिच्या कुटुंबाला सोडलं नाही

आमिर खानची दुसी पत्नी व चित्रपट निर्माती किरण रावने आमिरची पहिली पत्नी रीना दत्ता आणि त्यांच्या कुटुंबाशी कसं नातं आहे, याबद्दल खुलासा केला आहे. २००५ मध्ये किरण रावने आमिर खानशी लग्न केलं होतं. पण आपण फक्त आमिरशी नाही तर एका लग्न केलं होतं, असं ती म्हणाली. “मी खूप नशीबवान आहे की मी एका कुटुंबाशी लग्न केलं आणि अशा कुटुंबाशी ज्यांच्यावर माझं प्रेम आहे,” असं किरणने सांगितलं. तसेच आपलं आमिरच्या आई झीनत हुसैन यांच्यावर खूप प्रेम आहे, मला त्या खूप आवडतात, असं किरण म्हणाली.किरणने सांगितलं की आमिर खानचं कुटुंब खास आहे आणि २००२ मध्ये आमिरपासून घटस्फोट घेतल्यानंतर रीनाने कधीही कुटुंबाला सोडलं नाही. “रीनाने कधीही कुटुंब सोडलं नाही. आमिर आणि रीनाचा घटस्फोट झाला तेव्हा जसं होतं तसंच नंतरही होतं. कुटुंबातील सगळे रीनाची खूप काळजी घेत होते. जेव्हा माझं लग्न झालं तेव्हा रीना आमिरच्या कुटुंबाचा एक भाग होती. नंतर आम्ही दोघी चांगल्या मैत्रिणी झालो, कारण ती व्यक्ती म्हणून अप्रतिम आहे. माझं तिच्यावर खूप प्रेम आहे, ती माझी जवळची मैत्रीण आहे,” असं किरण म्हणाली.किरण आणि तिचा मुलगा आझाद, आमिर आणि त्याची मुलं आयरा आणि जुनैद हे सर्वजण एकमेकांच्या जवळ राहतात. ते कुटुंब म्हणून एकमेकांच्या खूप जवळ आहेत. आयरा व नुपूर यांच्या लग्नाची तयारी सर्वांनी मिळून केली, असंही किरणने सांगितलं.

## क्रिती खरबंदा करणार लग्न



बॉलीवूडमध्ये सध्या लग्नसोहळ्याचं वातावरण सुरू आहे. बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि जॅकी भगनानी लग्नबंधनात अडकले आणि कालच मीरा चोपडा आणि रक्षित यांचा लग्नसोहळा पार पडला. यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. अशातच आता पुलकित सम्राट आणि क्रिती खरबंदा १५ मार्चला लग्नगाठ बांधणार आहेत. अभिनेता पुलकित सम्राट आणि अभिनेत्री क्रिती खरबंदा यांनी फेब्रुवारीमध्येच साखरपुडा उरकला होता. आता या कपलच्या लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. यांचा लग्नसोहळा तीन दिवस चालणार आहे. पुलकित आणि क्रिती दिल्लीमध्ये सप्तपदी घेणार असल्याचं बोललं जातयं, तर काही मीडिया रिपोर्ट्सनुसार अशीही चर्चा आहे की, हरियाणामधल्या मानेसर येथे दोघांचा लग्नसोहळा पार पडणार आहे. परंतु, कपलने यावर काहीही खुलासा केलेला नाही.याबरोबरच सोशल मीडियावर पुलकितच्या घराचा एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यात त्यांचं घर रोषणाईने सजवलेलं आहे. या कपलच्या लग्नाची पत्रिकासुद्धा सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. त्यानुसार १३ मार्चला संगीत, १४ मार्चला हळद आणि १५ मार्चला लग्नाचे विधी होतील. हे कपल पंजाबी पद्धतीनुसार लग्न करण्याच्या चर्चाही सुरू आहेत.दरम्यान, अभिनेत्री क्रिती खरबंदा आणि पुलकित सम्राट गेल्या पाच वर्षांपासून डेट करत आहेत. दोघं सध्या ‘लिव्ह इन’मध्ये रहात असल्याचं सांगण्यात येतं. पुलकित आणि क्रितीच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर काही महिन्यांपूर्वीच पुलकितचा ‘फुकरे ३’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. तर क्रिती लवकरच ‘रिस्की रोमियो’ या चित्रपटात दिसणार आहे. तसेच दोघे ‘तैश’, ‘पागलपंती’ आणि ‘वीरे दी वेडिंग’ या चित्रपटांत एकत्र झळकले होते.

## डवर्ड क्रिस्टोफर शीरन सध्या भारतात

‘परफेक्ट’, ‘शेप ऑफ यू’ गाण्यांचा सुप्रसिद्ध गायक ED SHEERAN म्हणजेच एडवर्ड क्रिस्टोफर शीरन सध्या भारतात आला आहे. यामागचं कारण म्हणजे लवकरच ED SHEERANचा मुंबईमध्ये कॉन्सर्ट होणार आहे. याआधी मुंबईतील एका शाळेला भेट देऊन त्याने विद्यार्थ्यांसमोर त्याच्या हिट गाण्यांवर परफॉर्मही केलं. यानंतर त्याने बॉलीवूड अभिनेता आयुष्मान खुरानाचीही भेट घेतली आयुष्मान खुरानाने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर ED SHEERANबरोबर एक फोटो शेअर केला आहे. यात आयुष्मानने काळ्या रंगाची बॅगी हूडी घातली आहे, तर ED SHEERAN सफेद रंगाच्या टी-शर्टवर दिसतोय. या फोटोला कॅप्शन देत आयुष्मानने लिहिले, “ED SHEERANबरोबरच्या माझ्या पोलेरॉइड आठवणी, ED SHEERAN तुला भेटून खूप आनंद झाला.”ED SHEERAN नंतर एका पार्टीत गेला होता. तिथे तो प्रसिद्ध गायक अरमान मलिकलासुद्धा भेटला. या पार्टीत दोघांनी अरमानच्या ‘बुट्टा बोम्मा’ या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला. यात अरमान ED SHEERANला ‘बुट्टा बोम्मा’च्या हूक स्टेप शिकवताना दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरलदेखील झाला. याला अरमानने कॅप्शन देतं लिहिले, “माझा आवडता व्यक्ती माझ्या आवडत्या शहरात आला आहे.”दरम्यान, ED SHEERAN आशिया आणि युरोप टूर २०२४ चा भाग म्हणून भारतात परफॉर्म करणार आहे. त्याचा परफॉर्मन्स १६ मार्च रोजी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सवर होणार आहे. भारतातील ED SHEERANचा हा दुसरा कॉन्सर्ट असेल. २०१७ मध्ये भारतात त्याने पहिल्यांदा परफॉर्म केलं होतं.‘परफेक्ट’, ‘शेप ऑफ यू’ गाण्यांचा सुप्रसिद्ध गायक ED SHEERAN म्हणजेच एडवर्ड क्रिस्टोफर शीरन सध्या भारतात आला आहे. यामागचं कारण म्हणजे लवकरच ED SHEERANचा मुंबईमध्ये कॉन्सर्ट होणार आहे.

## मराठी गाण्यावर माधुरीचा जबरदस्त डान्स



‘तेजाब’, ‘दिल तो पागल हैं’ अशा एकापेक्षा एक लोकप्रिय चित्रपटांमधून माधुरी दीक्षितने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं. ९० च्या दशकात या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. सध्या अभिनेत्री ‘डान्स दिवाने’ कार्यक्रमात परीक्षकाची जबाबदारी निभावत आहे. माधुरीच्या अभिनयाप्रमाणे नृत्य कौशल्याची देखील सर्वत्र चर्चा असते. सध्या अभिनेत्रीने शेअर केलेल्या अशाच एका व्हिडीओने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. यामध्ये माधुरी एका लोकप्रिय मराठी गाण्यावर थिरकत असल्याचं पाहायला मिळत आहे.“गुलाबी साडी आणि लाली लाल लाल…” हे गाणं सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. संजू राठोड यांनी हे गाणं लिहिलं असून त्यांच्याच आवाजात संगीतबद्ध करण्यात आलं आहे. मराठी कलाविश्वापासून ते अगदी बॉलीवूडपर्यंत प्रत्येकाला या गाण्याची भुरळ पडली आहे. माधुरी दीक्षितने लाल रंगाचा सुंदर असा लेहेंगा परिधान करून या गाण्यावर जबरदस्त डान्स केला आहे. अभिनेत्रीच्या

# रोहित शर्मा हा एक उत्कृष्ट कर्णधार!

## कर्णधार रोहित शर्मा अश्विनसोबत खंबीरपणे उभा होता

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रोहित शर्मा हा एक उत्कृष्ट कर्णधार आहेच पण त्याचसोबत एक व्यक्ती म्हणून तो कमाल आहे. राजकोट कसोटीत अश्विनसोबत घडलेल्या प्रसंगावरून याचा प्रत्यय नक्कीच येतो. प्रतिकूल परिस्थितीत रोहितने एक कर्णधार म्हणून ती परिस्थिती ज्याप्रकारे हाताळली याबद्दल त्याचे कौतुक अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवरून केले. राजकोट कसोटी सुरू असताना अश्विनची आई घरात अचानक कोसळल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले होते, त्यामुळे अश्विन राजकोट कसोटी अर्ध्यातच सोडून चेन्नईला परतला होता.**



एका बाजूला आईला पाहण्याची ओढ आणि दुसऱ्या बाजूला भारतीय संघ अशी दुविधा मनस्थितीत अश्विन होता. हा प्रसंग सांगताना अश्विन म्हणाला, "मी विचारले की आई कशी आहे आणि ती शुद्धीत आहे का? यावर मला डॉक्टरांनी स्पष्टपणे सांगितले की तू तिला पाहशील अशा अवस्थेत ती नाही. तेव्हा मी पार खचून गेलो आणि रडू लागलो. मी चेन्नईला जाण्यासाठी फ्लाइट शोधत होतो पण मला ते मिळाले नाही. राजकोट विमानतळ ६ वाजता बंद होते कारण ६ नंतर तिथून एकही फ्लाइट नसते. मला काय करावे हे कळत नव्हते. रोहित (शर्मा) आणि राहुल (द्रविड) भाई माझ्या खोलीत आले आणि रोहितने अक्षरशः मला सांगितलं की आधी विचार करणं थांबव आणि माझ्या कुटुंबासह राहण्यासाठी चेन्नईमध्ये जाण्यास सांगितले. रोहितचे हे प्रयत्न पाहून अश्विन थक्क झाला होता. पुढे सांगताना फिरकीपटू म्हणाला "फिजिओ टीममधील कमलेश माझा खूप चांगला मित्र आहे. रोहितने त्याला माझ्यासोबत चेन्नईला जा आणि माझ्यासोबत तिथे राहण्यास सांगितले. पण मी कमलेशला सांगितले की तू इथेच संघासोबत राहा. मी खाली जाऊन पाहतो तर काय सिक्युरिटी आणि कमलेश तिथे माझ्या आधीपासूनच जाऊन थांबले होते. विमानतळाकडे जाताना कमलेशला रोहितचा फोन आला, रोहितने माझी विचारपूस केली आणि त्याला या कठीण काळात माझ्यासोबत राहण्यास सांगितले. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. मी रोहितचे वागणे पाहून पूर्णपणे थक्क झालो होतो. मी याचा विचारही करू शकत नाही. तिथे दोनच जण होते ज्यांच्याशी मी बोलू शकलो. पण तिथे कोणीच नसतं तर? माझ्या डोक्यात विचार आला की जर मी कर्णधार असतो तरी मीही माझ्या खेळाडूला अशा स्थितीत घरी परत जाण्यास सांगेन. पण मी पण त्याची विचारपूस करण्यासाठी लोकांना कॉल करेन का? मला माहीत नाही. हे खूपच

### सर्वाधिक विकेट् घेत मालिकेची सांगता

» एक नेता म्हणून मला त्याच्याबद्दल आधीच आदर होता, तो शेवटच्या क्षणापर्यंत खेळाडूला प्रश्न न करता पाठींबा देतो. ही काही सोपी गोष्ट नाही. धोनीही ते करतो. पण रोहित त्याच्यापेक्षा १० पटीने करतो." संघात परतल्यावर, अश्विनने २ वेळा ५ विकेट् घेत सर्वाधिक २६ बळी मिळवून मालिकेची सांगता केली.ज्यामध्ये भारताने इंग्लंडला ४-१ च्या फरकाने नमवत दोन-पाच बळी घेतले. ब्रेंडन मॅक्युलम आणि बेन स्टोक्स यांनी संघाची धुरा स्वीकारल्यानंतर इंग्लंड संघाचा हा पहिलाच मालिका पराभव होता.रोहित शर्मा हा एक उत्कृष्ट कर्णधार आहेच पण त्याचसोबत एक व्यक्ती म्हणून तो कमाल आहे. राजकोट कसोटीत अश्विनसोबत घडलेल्या प्रसंगावरून याचा प्रत्यय नक्कीच येतो. प्रतिकूल परिस्थितीत रोहितने एक कर्णधार म्हणून ती परिस्थिती ज्याप्रकारे हाताळली याबद्दल त्याचे कौतुक अश्विनने त्याच्या यूट्यूब चॅनलवरून केले. राजकोट कसोटी सुरू असताना अश्विनची आई घरात अचानक कोसळल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले होते, त्यामुळे अश्विन राजकोट कसोटी अर्ध्यातच सोडून चेन्नईला परतला होता.एका बाजूला आईला पाहण्याची ओढ आणि दुसऱ्या बाजूला भारतीय संघ अशी दुविधा मनस्थितीत अश्विन होता.

अविश्वसनीय होतं. त्या दिवशी मला रोहित शर्मामध्ये एक उत्कृष्ट नेता दिसला. "मी अनेक कर्णधार आणि नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली खेळलो आहे, पण आज रोहित शर्मा जे काही आहे ते त्याच्या चांगुलपणामुळे. धोनीच्या बरोबरीने पाच आयपीएल विजेतेपद पटकावणारा तो खेळाडू आहे तो. देव हे सहज कोणाला देत नाही. या सगळ्यापेक्षा त्याला काहीतरी मोठं मिळायला हवं, जे देव त्याला नक्कीच देईल. आजकालच्या या स्वार्थी जगात दुसऱ्याच्या भल्याचा विचार करणारा माणूस मिळणं दुर्मिळ आहे. या प्रसंगांनंतर माझ्या मनात रोहितबद्दलचा आदर खूप वाढला आहे.

# मुंबईला २०१५-१६ नंतर ट्रॉफी पटकावण्याची संधी

## रणजी करंडक: मुंबईच्या संघाला विजसासाठी 5 विकेट्सची गरज

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रणजी करंडक २०२३-२४चा अंतिम सामना वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे, या सामन्याच्या चौथ्या दिवशी डोंगराएवढ्या धावांचा पाठलाग करताना विदर्भाने मुंबईला रोखण्याचा प्रयत्न केला. विस्फोटक फलंदाज करुण नायर आणि विदर्भाचा कर्णधार अक्षय वाडकरने चौथ्या दिवशी कडवा प्रतिकार केला.**




पाहुणा संघ पाच गडी बाद २४८ धावांवर असताना चौथ्या दिवसाचा खेळ संपला. विदर्भाला विजय मिळवायचा असल्यास त्यांना आणखी २९० धावांची आवश्यकता आहे, त्यामुळे मुंबई संघाची सामन्यावर पकड कायम असल्याचे दिसत आहे. मुंबईच्या संघाला २०१५-१६ नंतर ट्रॉफी पटकावण्याची मोठी संधी आहे.चौथ्या दिवशी फलंदाजी करताना वाडकरच्या संघाने फिरकीपटूंविरुद्ध कडवी झुंज दाखवली. पहिल्या डावात ते केवळ १०५ धावांवर सर्वबाद झाले होते. चौथ्याच दिवशी मुंबई संघासमोर विदर्भचा संघ टिकू शकणार नाही अशी सर्वांनाच अपेक्षा असताना त्यांनी चांगली कामगिरी केली. करुण नायर आणि अक्षय वाडकर यांनी अर्धशतक झळकावले असले तरी संघाला अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. त्यामुळे मुंबई संघाची सामन्यावर पकड कायम असल्याचे दिसत आहे. विदर्भ संघाचे सलामीवीर अथर्व

### वाडकरने कडवा प्रतिकार केला

» करूण नायर आणि वाडकर या मधल्या फळीतील फलंदाजांनी संघाचा डाव सावरला. मुंबईच्या गोलंदाजीसमोर या दोघांनीही मैदानात आपले पाय घट्ट रोवले आणि अर्धशतके झळकावली. पण मुशीर खानने दिवसाच्या अखेरीस ७४ धावांवर असताना नायरला झेलबाद केले. मुंबई संघ पुन्हा रणजी ट्ऱॉफी चॅम्पियन बनण्यापासून पाच विकेट्स दूर आहे. तर विदर्भाकडून अक्षय वाडकर आणि हर्ष दुबे मैदानावर कायम आहेत.रणजी करंडक २०२३-२४चा अंतिम सामना वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे, या सामन्याच्या चौथ्या दिवशी डोंगराएवढ्या धावांचा पाठलाग करताना विदर्भाने मुंबईला रोखण्याचा प्रयत्न केला. विस्फोटक फलंदाज करुण नायर आणि विदर्भाचा कर्णधार अक्षय वाडकरने चौथ्या दिवशी कडवा प्रतिकार केला.

तायडे आणि ध्रुव शोरी यांनी त्यांना ६४ धावांची भागीदारी करून दमदार सुरुवात करून देण्याचा प्रयत्न केला पण शम्स मुलाणीने तायडेला बाद करून पहिली विकेट मिळवली. तनुष कोटियनने शोरीला बाद करत लगेचच दुसरी विकेट घेतली. अमन मोखाडे आणि यश राठोडला पायचीत करत त्यांना झटपट माघारी धाडले आणि पाहुण्या संघाचे १३३ धावांवर ४ विकेट गमावले होते.